सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २१ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ज्योती मल्होत्रा जिथे जिथे जाऊन आली तिथे तिथे पाकिस्तानचे ऑपरेशन सिंदूरवेळी हल्ले? गोल्डन टेंपल, पठाणकोट अन् काश्मीर...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१हिसार**

काही पैशांसाठी पाकिस्तानी गुप्तहेर बनलेल्या ज्योती मल्होत्राबाबत मोठमोठे खुलासे होत आहेत. यामुळे सुरक्षा यंत्रणांना आणखी सजग रहावे लागणार आहे. एरव्ही इकडे-तिकडे जात व्हिडीओ काढणाऱ्या ज्योती मल्होत्राने लष्करी दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या पठाणकोटला जाऊनही व्हिडीओ का काढला नाही, असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा ठाकला आहे.

ज्योती एका मोठ्या हेरगिरी रॅकेट मॉड्यूलशी जोडली गेल्याचे समोर येत आहे. तिचे एकेक कारनामे ऐकून एनआयएचे अधिकारी ही केस आपल्या ताब्यात घेण्याचा विचार करत आहेत. ऑपरेशन सिंदूर नंतर तिने पाकिस्तानी दूतावासातील अधिकारी दानिशशी चॅट केले होते. त्याला ब्लॅकआऊटची माहिती दिली होती. नंतर तिने ती डिलीट केली. तिने असे का केले याचा तपास सुरु आहे. तसेच ज्योती बांगलादेशला जाणार होती. हल्लीच्या काळात बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये जवळीक वाढू लागली आहे. भारताच्या



चिकन नेकपर्यंत पाकिस्तानी अधिकारी जाऊन आले आहेत. बांगलादेश सर्व उपकार विसरून भारताविरोधात कारस्थान रचू लागला आहे. अशातच ज्योतीने बांगलादेशसाठीच्या व्हिसाच्या अर्जाची प्रत देखील तयार केली होती.

यामध्ये तिने बांगलादेशची राजधानी ढाका येथील उत्तरेकडील भाग असा तात्पुरता पत्ता लिहिला होता. भारताविरोधात कारस्थान रचणाऱ्या आयएसआयच्या बांगलादेशी टीममध्ये सहभागी होण्यासाठी ती जाणार होती, असा संशय तपास अधिकाऱ्यांना आहे. तिथे ती एका बैठकीत भाग घेणार होती. बांगलादेशमध्ये आयएसआय नवीन टीम तयार करत असल्याचे आता स्पष्ट होत आहे. ज्योतीला पठाणकोटला नेण्यात आले आहे. तिथे तिने काय केले हे देखील तपासले जात आहे. तिने या प्रवासाचा व्हिडीओ का काढला नाही असा प्रश्नही यामागे उपस्थित होत आहे. फेसबुकवर शेअर केलेल्या फोटो आणि एका छोट्या क्लिपवरून तिने पठाणकोटला भेट दिल्याचे समोर आले.

### पठाणकोट, गोल्डन टेंपलवर हल्ल्याचा प्रयत्न...

ऑपरेशन सिंदूरवेळी पाकिस्तानने पठाणकोट लष्करी तळ आणि गोल्डन टेंपलवर हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. आर्मी कॅन्टोन्मेंट आणि एअर बेसची तपासणी करण्यासाठी ती तिथे गेल्याची शक्यता आहे. तसेच ज्योतीने व्हॉट्सअ‍ॅप, स्नॅपचॅट आणि टेलिग्राम सारख्या एन्क्रिप्टेड माध्यमांद्वारे गोल्डन टेंपल आणि काश्मीरमधील पर्यटन स्थळांचे व्हिडिओ व लोकेशन पाकिस्तानी एजंटना पाठविले आहेत. सध्या एनआयए आणि आयबी ज्योतीची चौकशी करत आहेत. तिची कोठडी २२ मे रोजी संपत आहे.

## मुंबईतून मालवणात फक्त ४ तासांत फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

गणपतीत कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी खुशखबर हाती आली आहे. गणपतीत आता समुद्र मार्गे प्रवास करता येणार आहे. चाकरमान्यांना कमी वेळेत गावी पोहोचवण्यासाठी मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी पुढाकार घेतला आहे.



फडणवीस सरकारच्या निर्णयामुळे साडेचार तासांत मालवण, विजयदुर्ग तर तीन तासांत रत्नागिरी गाठता येणार आहे. आता मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरू होणार आहे.

जलवाहतूक सेवा सुरू झाल्याने चाकरमानी कमी वेळेत कोकणात पोहोचणार आहेत. हायटेक यंत्रणा असलेल्या एम टू एम या बोटीमार्फत कोकणात प्रवास करणार आहेत. फडणवीस सरकारच्या निर्णयामुळे चाकरमान्यांचा मोठा त्रास कमी होणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा महत्वाचा निर्णय मानला जात आहे.

गणेशोत्सवात कोकणात जाताना चाकरमान्यांना रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडीने होणारी परवड आणि वेळखाऊ प्रवासाचा त्रास चाकरमान्यांसाठी नेहमीचाच झाला आहे. या त्रासातून दिलासा देण्यासाठी मत्स्य व बंदरे विभागाकडून मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरू करण्यात येणार आहे.

## एक तर तू राहशील नाहीतर मी उद्धव ठाकरेंचं वाक्य आमच्या जिव्हारी

### मुंबई मनपात वचपा काढणार, भाजपने रणशिंग फुंकलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

एकतर तू राहशील नाहीतर मी राहील, हे उद्धव ठाकरेंचे वाक्य अखख्या भारतीय जनता पक्षाच्या जिव्हारी लागलं असल्याचे मत भाजप आमदार आशिष शेलार यांनी व्यक्त केले. आपण काय बोलतो आणि त्याच्यावर समोरच्याची काय प्रतिक्रिया येऊ शकते याचं भान सुटलेला नेता बेभान नेता म्हणजे उद्धव ठाकरे असल्याची टीका शेलार यांनी केली. उद्धव ठाकरे गेल्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांना म्हणाले होते की, देवेंद्र एक तर तू राहशील नाहीतर मी राहील, यावरुन शेलारांनी ठाकरेंचा चांगलाच समाचार घेतला. विधानसभा निवडणुकीत जनतेने दाखवलं आहे की, भाजप आणि देवेंद्रजी कुठे आहेत. उद्धव ठाकरे कुठे राहिले? असा सवाल शेलारांनी केला.



**मुंबई महापालिका निवडणूक महायुतीत लढणार आणि जिंकणारही**

एकतर तू राहशील नाहीतर मी राहील, हे उद्धव ठाकरेंचे वाक्य भाजपच्या जिव्हारी लागले आहे. मुंबईकर या निवडणुकीत दाखवतील उद्धवजी तुम्ही कुठे असाल? असा सवाल शेलारांनी केला. तुम्ही जी पोपटपंची केली त्याचे उत्तर मिळेल असंही शेलार म्हणाले. मुंबई महापालिका निवडणूक महायुतीत आम्ही लढणार आहोत आणि जिंकणारही आहोत असा विश्वास शेलारांनी व्यक्त केला. ५० पेक्षा कमी जागा महाविकास आघाडीला मुंबई महापालिका निवडणुकीत मिळणार असल्याचे शेलार म्हणाले.

**रोज बडबड करणाऱ्या उबाठा गटाच्या नेत्यांना मुंबईशी काही घेणेदेणे नाही**

मुंबईकरांचा सेक्रेटरी कोण? याच मुद्द्यावर मुंबई महापालिका निवडणूक होणार आणि महायुती जिंकणार असल्याचे शेलार म्हणाले. मुंबई महापालिका निवडणुका येऊ घातल्यात. तारीख कळेल, भाजपा मागील दीड वर्षापासून तयारी करत असल्याचे शेलार म्हणाले. मतदारांचा मतदानापुरता विचार करणे हे भाजपचे धोरण नाही. मी मुंबईभर फिरतोय आणि ज्या प्रकारे मला दिसतंय उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी मुंबईकडे पाठ दाखवली आहे. रोज बडबड करणाऱ्या उबाठा नेत्यांना मुंबईशी काही घेणेदेणे नसल्याची टीका शेलारांनी केली. ते नाल्यांवर रस्त्यांवर कुठेही दिसत नाही. ते फक्त टीव्हीवर दिसतात. टीव्हीवर दिसून मतं मिळतात हा गैरसमज आहे असल्याची टीका शेलारांनी ठाकरेंवर केली.

## सरन्यायाधीशांनी स्वत:ची अन् त्यांच्या खुर्चीची इभ्रत, गरिमा राखली पाहिजे

### प्रकाश आंबेडकरांचा चीफ जस्टीस भूषण गवईंना सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धाराशिव**

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी स्वतःची आणि त्यांच्या खुर्चीची इभ्रत व गरिमा राखली पाहिजे. जेव्हा ते खुर्चीवर बसतात, तेव्हा ज्यांनी त्यांच्या सन्मानाकडे दुर्लक्ष केलं, अशा सेक्रेटरींना त्यांनी नोटीस बजावली पाहिजे, असा सल्ला वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी चीफ जस्टीस भूषण गवई यांना दिला आहे. प्रकाश आंबेडकर हे



आज धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी देशाचे चीफ जस्टीस भूषण गवई यांच्याबाबत नाराजीच्या चर्चेवर भाष्य केलंय.

यावेळी ते म्हणाले की, राज्य सरकारने त्यांच्या दौऱ्यात मान-सन्मान केला किंवा नाही, हा मुद्दा गौण असून, तुम्हाला लोकांनी त्या पदावर बसवलं आहे, त्यामुळे त्या पदाची प्रतिष्ठा राखणं तुमचं कर्तव्य आहे, असं ही प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी ठामपणे सांगितलं.नुकत्याच मुंबई येथे झालेल्या एका कार्यक्रमातून सरन्यायाधीशांनी राज्याच्या पोलीस प्रमुखांचे, मुख्य सचिवांचे आणि मुंबई पोलीस आयुक्तांचे कान टोचले. त्यानंतर, धावत पळत हे तिन्ही अधिकारी प्रोटोकॉलनुसार सरन्यायाधीशांच्या स्वागताला पोहोचले होते. दरम्यान, याच मुद्यावरून अनेक टीका आणि प्रतिक्रिया येऊ लागल्या असताना आता याच मुद्द्यावर बोट ठेवत

प्रकाश आंबेडकर यांनी आपले परखड मत व्यक्त केलं आहे. सत्काराच्या कार्यक्रमांमध्ये राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉल पाळला नाही, अशी तक्रार चीफ जस्टीस गवई यांनी केली होती. यानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. यावर आज प्रकाश आंबेडकर यांनी आपलं मत व्यक्त केल आणि खुर्चीची इभ्रत राखण्याचा सल्ला ही दिला आहे.

## सैफुल्लाहच्या शोकसभेत भारताविरोधात ओकली गरळ; पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा पुन्हा उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१कराची**

पाकिस्तानातीलदहशतवादी संघटना आणि सैन्याचे कनेक्शन पुन्हा एकदा जगासमोर उघड झाले आहे. अलीकडेच सिंध प्रांतात लश्कर ए तोयबाचा दहशतवादी रजाउल्लाह निजामनी उर्फ सैफुल्लाहला अज्ञात हल्लेखोरांनी ठार केला. या हल्ल्यानंतर पाकिस्तानातून ज्या प्रतिक्रिया पुढे येत आहेत त्यातून पाकिस्तानचा दहशतवादाबाबतचा खरा चेहरा समोर आला आहे. सैफुल्लाहच्या मृत्यूवर पाकिस्तानी मरकज मुस्लीम लीगने



शोकसभेचे आयोजन केले होते. त्यात हाफीद सईदचा मुलगा ताल्हा सईद हजर होता. या सभेत एकीकडे सैफुल्लाहच्या मृत्यूवर शोक व्यक्त केला तर दुसरीकडे भारताविरोधात गरळ ओकण्यात आली.

इतकेच नाही तर या शोकसभेत पाकिस्तानी सैन्य आणि त्याचे प्रमुख जनरल फिल्ड मार्शल बनलेले असीम मुनीर यांचेही कौतुक करण्यात आले. ही सभा मार्का ए हक नावाने आयोजित केली होती. ज्यात सैन्य आणि दहशतवादी संघटनांची जवळीक पुन्हा सार्वजनिकरित्या समोर आली. PMML हा पक्ष आहे ज्याच्या तिकिटावर ताल्हा सईदने लाहोरमधून संसदेची निवडणूक लढली होती. ताल्हा आणि त्याचा पक्ष निवडणुकीत हारला होत परंतु या पक्षाची भूमिका आजही पाकिस्तानातील दहशतवादी राजकारणात महत्त्वाची ठरत आहे.

दरम्यान, पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवादी संघटना यांची मैत्री पहिल्यांदाच जगासमोर आली नाही. मात्र प्रत्येकवेळी पाकिस्तानी सरकार आणि तिथले सैन्य स्वत:ला यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करते. हाफीज सईद, मसूद अजहर, जकीर रहमान लखवीसारख्या दहशतवाद्यांना संरक्षण देणारी पाकिस्तानी व्यवस्था आता नवे चेहरे आणि राजकीय पक्षाच्या माध्यमातून दहशतवादाला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करत आहेत.

## विद्यापीठाचे ‘युनी कनेक्ट’ मोबाईल ॲप कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते लाँच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थी हिताच्या विविध योजना विद्यापीठाकडून राबविण्यात येत आहेत. त्यात आता विद्यापीठाच्या मोबाईल ॲप ची आणखी भर पडली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ‘युनी कनेक्ट’ हे मोबाईल ॲप कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते आज बुधवार दि. २१ मे, २०२५ रोजी लाच करण्यात आले आहे. या मोबाईल ॲपमुळे आता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी जुळले असून विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचबरोबर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख,

### पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी अमरावती विद्यापीठ सदैव ‘कनेक्ट’

कर्मचा-यांनाही या मोबाईल ॲपमुळे मोठी सुविधा निर्माण झाली आहे. सदर मोबाईल ॲपमध्ये महाविद्यालयांची यादी, महाविद्यालये, विद्यापीठाच्या विभागाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेले अभ्यासक्रम, अध्ययन, परीक्षांची वेळापत्रके, निकाल, मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, शैक्षणिक कॅलेंडर, परिपत्रके, सूचना, उपक्रम, विविध विद्यार्थी हितार्थ योजना,



संशोधन, रोजगार, शिष्यवृत्ती आदींची विस्तृत माहिती अगदी सहजपणे एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल.

विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानाबद्दल असलेली आवड लक्षात घेता सदर ॲपव्दारे आवश्यक ती शैक्षणिक आणि करिअर विकासासाठीची संसाधने एकाच प्लॅटफॉर्मवर एकत्र आणण्याचे यामागील उद्दिष्ट आहे. सदर ॲप केवळ शैक्षणिक माहितीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी उपयुक्त संसाधने प्रदान करते. स्थानिक तसेच बाहेरील कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, नोकरीच्या संधी शोधण्याची आणि त्यासाठी अर्ज करण्याची सुविधा देखील या ॲपवर उपलब्ध आहे.

सदर ॲप आय.ओ.एस. आणि अँड्रॉईड अशा दोन्ही प्लॅटफॉर्मवर डाऊनलोड करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या मोबाईलवर ॲप डाऊनलोड केल्यानंतर त्यांचे महाविद्यालय, अभ्यासक्रम याबाबत नोंद करावयाची आहे. त्या नोंदीनुसार विद्यार्थ्यांना संबंधित माहिती अगदी सहजरित्या मिळू शकेल.

याप्रसंगी बोलतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच रोजगाराभिमुख कौशल्य विकास व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत, जेणेकरुन विद्यापीठातून शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल. या मोबाईल ॲपमुळे विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण देखील वेळीच करता येईल.

## संपादकीय ......

# खगोलशास्त्रातील ध्रुव तारा

आंतरराष्ट्रीय क्षितिजावर ज्या मोजक्या महाराष्ट्रीय वैज्ञानिकांनी छाप सोडली, त्यातील एक म्हणजे महाराष्ट्र भूषण डॉ. जयंत नारळीकर. त्यांच्या निधनामुळे विज्ञानजगतात एक पोकळी निर्माण झाली आहे. डॉ. नारळीकर यांनी १९६३ मध्ये प्रा. फ्रेड हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली खगोल भौतिकशास्त्रात मौलिक संशोधन करून विशेष गुणवत्तेसह डॉक्टरेट मिळवली. १९७२ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये अध्यापनाचे काम केले. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाचे राष्ट्रीय प्राध्यापक म्हणूनही काम केले. प्रा. हॉईल यांच्यासोबत केलेल्या क्वांटम इलेक्ट्रो डायनॅमिक्सवरील संशोधनाने त्यांना जागतिक कीर्ती मिळाली. 'हॉईल-नारळीकर सिद्धांत' म्हणून त्यांचे हे संशोधन प्रसिद्ध आहे. त्यामुळे गुरुत्वाकर्षणासंबंधीचा नवा सिद्धांत तयार झाला. त्याला 'कन्फॉर्मल थिअरी ऑफ ग्रॅव्हिटी' म्हणून ओळखले जाते. तसेच नारळीकरांनी भारतातील सहकार्यांसमवेत रेडिओ लहरी, गुरुत्वाकर्षण व अवकाश विज्ञानासंबंधीच्या अनेक संशोधनात भाग घेतला.

भौतिक आणि खगोल विज्ञानाच्या विकासासाठी पुण्यात आंतरविद्यापीठ स्तरावर खगोलशास्त्र व खगोल भौतिकशास्त्र केंद्र (आयुका) कार्यान्वित करण्यात नारळीकरांनी मोलाची कामगिरी बजावली. त्यांचे विज्ञान संशोधन व प्रसारातील कार्य इतके मोठे आहे की, त्यांना प्रतिष्ठेचा 'शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार' तसेच युनेस्कोचा कलिंग पुरस्कारही मिळाला. ब्रिटनच्या रॉयल सोसायटीने त्यांना सन्माननीय सदस्यत्व दिले, तर कृष्णविवरासंबंधी नारळीकरांनी केलेले महत्त्वपूर्ण संशोधन मैलाचा दगड ठरले. वैज्ञानिक दृष्टिकोन जपावा आणि अंधश्रद्धा दूर व्हाव्यात, यासाठी नारळीकर धडपडत राहिले. इंग्रजी-हिंदीप्रमाणेच मराठीतील विज्ञान लेखनात त्यांचा फार मोठा वाटा आहे.

दि. ४ ऑक्टोबर १९५७ रोजी सोव्हिएत रशियाने 'स्पुटनिक-१' हा जगाच्या इतिहासातील पहिला मानवनिर्मित उपग्रह पृथ्वीभोवतालच्या कक्षेत यशस्वीरीत्या सोडला. या घटनेने तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू प्रभावित झाले आणि अवकाश संशोधन क्षेत्रात कार्य सुरू व्हावे, यादृष्टीने त्यांनी देशातील अग्रणी वैज्ञानिकांना प्रोत्साहित केले. १९६१ मध्ये अणुशक्ती विभागाचे संचालक डॉ. होमी भाभा यांच्याकडे अवकाश संशोधनाची जबाबदारी सोपवली. नवभारताच्या उभारणीसाठी ज्यांनी अशी अनेक स्वप्ने पाहिली, त्यामध्ये नारळीकरांचा समावेश करावा लागेल. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणितज्ज्ञ होते आणि केंब्रिजमधून शिकून आले होते. बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदनमोहन मालवीय यांनी त्यांना विद्यापीठात येण्याची आग्रहाची विनंती केल्यानंतर रँग्लर विष्णू हे तेथील गणित शाखेचे प्रमुख बनले. त्यामुळे जन्म कोल्हापुरातील असला, तरी ते वाराणसीतच वाढले. त्यांची आई सुमती याही संस्कृत विदुषी होत्या.

विज्ञानात बी. एस्सी.मध्ये ते प्रथम क्रमांकावर उत्तीर्ण झाले आणि केंब्रिजमध्ये त्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले. तेथेच रँग्लर ही पदवी आणि खगोलशास्त्राचे 'टायसन मेडल' त्यांना मिळाले. केंब्रिजच्या एका निबंध स्पर्धेत त्यांना व जगद्विख्यात वैज्ञानिक स्टिफन हॉकिंग यांना विभागून पुरस्कार मिळाला. खगोलशास्त्रात प्रथम क्रमांक मिळत राहिल्यामुळे केंब्रिजमध्ये त्यांना गुरूची निवड करण्याचीही संधी मिळाली. त्यामुळे हॉईल यांच्या हाताखाली त्यांना अध्ययन करता आले. पुढे त्यांच्यासमवेतच नारळीकरांनी जगद्विख्यात सिद्धांत मांडला आणि वयाच्या २६व्या वर्षी 'पद्मभूषण' हा किताब त्यांना मिळाला. हा सिद्धांत नेमका काय आहे, त्याबद्दल व एकूणच विज्ञानाबद्दल प्रबोधनपर अशी व्याख्याने देत त्यांनी भारतभ-मण केले. तेव्हा नारळीकरांच्या व्याख्यानांना तोबा गर्दी होत असे. चेन्नईत झालेल्या सभेस इतके लोक जमले की, सभेच्या अध्यक्षांनाच व्यासपीठावर येता आले नाही.

दिल्लीत 'महाराष्ट्राचा चिंतामणी' म्हणून ज्यांचा गौरव झाला, ते सी. डी. देशमुख हे नारळीकरांच्या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. त्यावेळी गर्दी इतकी ओसंडून वाहू लागली की, कित्येक मान्यवरांना सभास्थानी शिरता आले नाही. इंदिरा गांधी यांनाही तेव्हा विंगेत उभे राहून भाषण ऐकावे लागले होते, अशी आठवण नारळीकर नेहमी सांगत असत. 'आयुका'सारखी संस्था उभारण्यात नारळीकरांनी व्यवस्थापकीय कौशल्यही पणाला लावले आणि आज ही संस्था केवळ पुण्याचेच नाही, तर देशाचे भूषण ठरली आहे; मात्र वैज्ञानिक संस्थेत शास्त्रज्ञांना मतभेद व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. विदेशात विज्ञान संशोधन संस्थांत कोणते नवे संशोधन केले आहे, याला अधिक महत्त्व असते, असे नारळीकर म्हणत असत.अध्ययनात फलज्योतिषशास्त्र हा विषय म्हणून घेण्याचे जेव्हा ठरत होते, तेव्हा त्यास प्रा. यशपाल व नारळीकर यांनी स्पष्टपणे विरोध केला होता. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातही नारळीकरांनी वाटा उचलला होता. ज्या गोष्टी तपासून न पाहता मान्य केल्या जातात, त्या अंधश्रद्धा होत. प्रत्येक बाब तार्किकतेच्या कसोटीवर तपासून पहिली पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. आधुनिक जगात ज्ञान-विज्ञानाला महत्त्व आहे आणि म्हणूनच विज्ञानकथेच्या रूपाने विज्ञान प्रसार होईल, हे नारळीकरांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी 'यक्षांची देणगी' हा कथासंग्रह लिहिला. 'उजव्या सोंडेचा गणपती' ही त्यांची कथा विशेष गाजली. त्यांच्या या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. दुर्गा भागवत यांनी नारळीकरांच्या कथा लेखनाचे सर्वात आधी कौतुक केले.

# मोबाईल नंबर अपडेट करा, वीज पुरवठ्याशी संबंधित माहिती मिळवा!

## वीज पुरवठा तक्रारीसाठी नियंत्रण कक्षाची सोय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती,-**

महावितरणकडे मोबाईल क्रमांक नोंदणी असणाऱ्या वीज ग्राहकांना पूर्वनियोजित देखभाल-दुरुस्ती, खंडित वीज पुरवठ्याची माहिती, मीटर रीडिंग घेतल्याची तारीख व युनिटची संख्या, वीज बिलाची रक्कम, देय दिनांक, वीज पुरवठा खंडित करण्याची नोटीस याची माहिती वीज ग्राहकांना एसएमएस दिल्या जाते. त्यामुळे मोबाईल नंबर नोंदणी नसलेल्या अमरावती परिमंडळातील वीज ग्राहकांनी स्वतःच्या मोबाईल क्रमांकाची नोंदणी करावी आणि महावितरणच्या या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

अमरावती परिमंडळातील १३ लाख ५२ हजार ४३१ ग्राहकांपैकी १३ लाख ४२ हजार ९४२ ग्राहकांनी महावितरणकडे आपल्या मोबाईल नंबरची नोंद केली आहे.यामध्ये घरगुती,व्यावसायिक,औद्योगिक,कृषी व इतर अश्या सर्व वर्गवारीतील ग्राहकाचा यात समावेश आहे.जिल्हानिहाय आकडेवारीमध्ये अमरावती जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार ग्राहकांपैकी ७ लाख ४० हजार ग्राहकांनी महावितरणकडे आपले मोबाईल नंबर नोंदणी केले



आहे.यवतमाळ जिल्ह्यात एकुण वीज ग्राहकाची संख्या ६ लाख ४५ हजार असून ६ लाख २ हजार वीज ग्राहकांनी महावितरणकडे मोबाईल नंबर नोंदणी केले आहे.

**तर मोबाईल नंबर अपडेट करा :-**

काही ग्राहकांचे चुकीचे क्रमांक नोंदवलेले असू शकतात, अशा ग्राहकांनी आपला अचूक मोबाईल क्रमांक नोंदवावा. तसेच ज्या ग्राहकांना आधी नोंदवलेला मोबाईल क्रमांक बदलायचा असेल त्यांनीही नवीन क्रमांक नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**अशी करा ई-मेल किंवा मोबाईल क्रमांकाची नोंदणी :-**

महावितरणच्या ु.ारहरवळीले.ळप या संकेतस्थळावरून किंवा महावितरण ॲपद्वारे मोबाईल क्रमांक व ई-मेलची नोंदणी करण्याची सोय आहे.

वीजग्राहकांनी नोंदणी करावयाच्या मोबाईल क्रमांकावरून चठएऋ (स्पेस) (बारा अंकी ग्राहक क्रमांक) अशी माहिती टाइप करून ९९३०३९९३०३ क्रमांकावर एसएमएस केल्यास मोबाईल क्रमांकाची नोंदणी होते.

याशिवाय २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरच्या टोल फ्री १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या क्रमांकांवर संपर्क साधून नोंदणी करता येते.

**वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारीसाठी कंट्रोल रूम:-**

मान्सुनपुर्वीचा काळ हा महावितरणसाठी संक्रमणाचा काळ असतो.वादळ -वारा,वीज चमकणे आदीमुळे वीज यंत्रणेवर परिणाम होऊन वीज पुरवठा वारंवार खंडित होतो. महावितरणकडून खंडित वीज पुरवठ्याची तत्काळ दखल घेण्यात येत असली तरी, ग्राहकांना वीज पुरवठ्याबाबत तक्रार दाखल करता यावी आणि त्या तक्रारीची दखल घेत तत्काळ सोडवणूक व्हावी यासाठी जिल्हास्तरावर निर्माण करण्यात आलेल्या कंट्रोल रूमच्या ७८७५७६३८७३ या नंबरवर कॉल करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.




# हेल्दी डाइटमध्ये पनीर की टोफू, योग्य पर्याय कोणता?

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या हेल्दी डाइट आणि फिटनेसबाबत जागरूकता वाढल्याने लोक आपली आहारशैली अधिक सजगपणे निवडू लागले आहेत. प्रथिने, कॅल्शियम आणि हेल्दी फॅट्सचा समावेश डाइटमध्ये होत आहे. मात्र, शाकाहारी लोकांसाठी प्रथिनांचा चांगला स्रोत शोधणं थोडं कठीण असतं. टोफू आणि पनीर हे दोघंही उत्तम प्रथिनांचे स्रोत आहेत.




दिसायला दोघंही सारखे असले, तरी त्यांचं बनवण्याची प्रक्रिया, पोषकतत्त्वं आणि फायदे वेगवेगळे आहेत. चला तर पाहूया टोफू आणि पनीरमधील फरक व कोणतं आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

**पनीरचे फायदे:**

**प्रथिनांचा समृद्ध स्रोत:** पनीरमध्ये उच्च प्रमाणात प्रथिने असतात, जे मसल्स वाढवण्यासाठी आणि शरीर मजबुत ठेवण्यासाठी मदत करतात.

**हाडे आणि दात मजबूत करतो:** पनीरमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असतात, जे हाडे आणि दात मजबूत ठेवतात.

**ऊर्जा वाढवतो:** पनीरमध्ये फॅटचे प्रमाण जास्त असल्याने ते शरीराला त्वरित ऊर्जा पुरवते.

**वजन वाढवण्यासाठी उपयोगी:** ज्यांना वजन वाढवायचं आहे, त्यांच्यासाठी पनीर हा एक चांगला पर्याय आहे.

**ब्लड शुगर नियंत्रणात ठेवतो:** पनीरचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे तो ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणात ठेवतो.

**मेंटल फोकस सुधारतो:** पनीरमध्ये असणारे काही पोषक घटक मेंदूच्या कार्यक्षमतेला मदत करतात.

**दीर्घकाळ पोट भरल्यासारखं वाटतं:** प्रथिने आणि फॅट्समुळे पनीर खाल्ल्यावर भूक कमी लागते, जे वजन नियंत्रणासाठी मदत करू शकते.

**टोफूचे फायदे:** कमी कॅलरी आणि फॅट:

टोफूमध्ये कॅलरी आणि फॅट कमी असतात, त्यामुळे ते वजन कमी करणाऱ्या आहारात उपयुक्त आहे.

**हृदयासाठी फायदेशीर:** टोफूमध्ये कोलेस्टेरॉल नसतो, त्यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहते.

**शुद्ध वनस्पतीजन्य प्रथिने स्रोत:**

टोफू हे सोयापासून बनते आणि शाकाहारी तसेच व्हेगन लोकांसाठी प्रथिनांचा उत्तम पर्याय आहे.

**अँटीऑक्सिडंट्सने भरलेले:**

यामध्ये नावाचे अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीराच्या पेशींना नुकसानापासून वाचवतात.

**हार्मोन्सचं संतुलन राखतो:** टोफूमधील घटक महिलांमध्ये हार्मोनल बॅलन्स राखण्यास मदत करतात, विशेषतः मासिक पाळी आणि रजोनिवृत्ती दरम्यान.

**पचनासाठी फायदेशीर:** टोफूमध्ये थोडं फायबर असतं, जे पचनसंस्थेला मदत करतं.

**लॅक्टोज इन्टॉलरंट लोकांसाठी योग्य:** दूध व दुग्धजन्य पदार्थ सहन न होणाऱ्या लोकांसाठी टोफू एक उत्तम पर्याय आहे.

**काय निवडावं?** जर तुम्हाला मसल्स वाढवायचे असतील, तर पनीर फायदेशीर ठरेल. पण जर वजन कमी करायचं असेल किंवा कमी फॅट आणि कोलेस्टेरॉलयुक्त पर्याय हवा असेल, तर टोफू अधिक चांगला पर्याय आहे. व्हेगन किंवा लॅक्टोज इन्टॉलरंट लोकांसाठी टोफू एक उत्तम पर्याय ठरतो.

# खते, बियाणे व कीटकनाशके कुठून खरेदी कराल? काय काळजी घ्याल? वाचा सविस्तर

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकरी बांधवांनी खते, बियाणे व कीटकनाशके खरेदी करत असताना सदर निविष्ठा परवानाधारक कृषी सेवा केंद्र विक्रेत्याकडूनच खरेदी कराव्यात.

तसेच खरेदी केलेल्या निविष्ठांची पक्की बिले घ्यावीत, यातून शेतकऱ्यांची फसवणूक टाळता येऊ शकते, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

सध्या खरिपाचा हंगाम सुरू असून, काही प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीत आहेत. परंतु अनेकदा शेतकऱ्यांची बियाणे तसेच खतांमध्ये फसवणूक होते. त्यामुळे कृषी विभागाने यामध्ये लक्ष घातले असून, शेतकऱ्यांसाठी काही सूचना केल्या आहेत.शासनमान्य अधिकृत बियाणे विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावे, त्या विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे, बियाण्याचे पाकीट किंवा पिशवी सीलबंद असल्याची खात्री करून घ्यावी.

घरातील सातबाराधारकाच्या नावाने शक्यतो बियाणे खरेदी करावे, याशिवाय खते खरेदी करताना जमीन आरोग्यपत्रिकेनुसार व पिकाच्या गरजेनुसार खताची मात्रा ठरवून अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडून पक्के बिल घेऊनच खते खरेदी करावे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

खरेदीचे बिल पिकांचा हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे, संयुक्त खतांऐवजी सरळ खतांचा वापर करावा, कीटकनाशके खरेदी करताना एका वेळेस संपूर्ण फवारणीसाठी आवश्यक तेवढेच औषध खरेदी करावे.

फवारणी करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी, कोणत्याही स्थितीत फेरीवाल्याकडून किंवा इतर अनधिकृत दुकानातून खते, बियाणे खरेदी करू नये, यातून फसवणूक होऊ शकते, असे




आवाहन कृषी विभागाने केले


**कृषी तक्रार व्हाट्सअॅप हेल्पलाइन** - शेतकरी बांधवांना खते, बियाणे विक्री करणारे केंद्रे विशिष्ट कंपनीचे खत किंवा बियाणे खरेदी करण्यासाठी सक्ती करत असतील अथवा चढ्या भावाने विक्री करत असतील तसेच बियाणे, खते, कीटकनाशके आदींच्या खरेदीबाबत आपली तक्रार असेल तर ९८२२४४६६५५ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पुराव्यासह तक्रार पाठवावी. त्यावर शहानिशा करून तत्काळ कारवाई करण्यात येईल, तसेच तक्रार देणाऱ्या शेतकऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल-

**तक्रार असेल तर संपर्क करा** शेतकऱ्यांना बी, बियाणे किंवा खतांबाबत काही तक्रार असेल तर त्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० यावर संपर्क करावा किंवा तालुका कृषी अधिकारी, तसेच जिल्हा परिषदेत कृषी विभागाशी संपर्क करावा.

# कृषी सहायकांच्या बंदमुळे कामे ठप्प, बीज प्रक्रिया मोहिम बंद असल्याने शेतकरी त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती-** प्रलंबित मागण्यांकडे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी गुरुवारी दि. १५ मे पासून महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेने बेमुदत काम बंद आंदोलनाची हाक दिली आहे. खरीप हंगामाच्या तोंडांवर आंदोलनाचे हत्यार उपसण्यात आल्याने थेट खरिपाच्या नियोजनावर होऊ लागले आहेत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या




आंदोलनामुळे पोकरा, स्मार्ट, पीएम किसान या मुख्य योजनांची कामे ठप्प झाली असून, नैसर्गिक आपत्तीनंतरची पंचनाम्याची कामे झालेली नाहीत. आंदोलनामुळे खरीप हंगामपूर्व होणाऱ्या गाव बैठका झालेल्या नाहीत. त्यामुळे सोयाबीन बियाणे उगम क्षमता चाचणी प्रयोग अद्यापही झालेले नाहीत. परिणामी, शेतकऱ्यांना बियाणे योग्य की अयोग्य याची माहिती न मिळालेली नाही. बियाणे उगवण क्षमतेचा अंदाज न आल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच, आंदोलनामुळे बीज प्रक्रिया मोहिमा झालेल्या नाहीत.

# 'या' तीन सोप्या पद्धतींनी घरच्या घरी करा उगवण क्षमता तपासणी

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

जवळ आला की शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. उत्पादनात भरघोस वाढ व्हावी, यासाठी बियाण्याची निवड हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो. अनेकदा शेतकरी बांधव दरवर्षी बाजारातून नवे बियाणे खरेदी करतात.

परंतु, हे बियाणे महाग असतानाही त्याची उगवणक्षमताकितपत योग्य आहे, हे निश्चित नसते. अशा वेळी वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याचा धोका असतो. त्यामुळेच 'उगवणक्षम बियाणं' वापरणे हा खरीप यशस्वी करण्याचा मूलमंत्र ठरतो.

**उगवणक्षमता तपासणीच्या तीन सोप्या पद्धती -**

गोणपाट वापरून तपासणी : प्रत्येक पोत्यातून थोडे बियाणे घेऊन एकत्र करा.

१०० दाण्यांचे ३ नमुने तयार करा.

ओल्या गोणपाटावर दाणे १०-१० च्या रांगेत लावा.

वरून दुसरा ओला गोणपाट घाला आणि गुंडाळी करून सावलीत ठेवा.

६ ते ७ दिवसांनी उगवलेले दाणे मोजा.

७० टक्के किंवा त्यापेक्षा



अधिक उगवणक्षमता असल्यास बियाणे योग्य आहे, असे समजावे.

**रद्दी पेपर वापरून तपासणी :**

रद्दी पेपरला चार घड्या घालून ओले करा.

प्रत्येकी १० बियांच्या १० ओळी तयार करा (एकूण १०० बिया).

गुंडाळ्या करून पिशवीत ठेवा.

काही दिवसांनी अंकुर आलेल्या बिया मोजा.

७० टक्के किंवा अधिक बिया उगवल्यास बियाणे योग्य समजावे.

**पाण्यात भिजवून त्वरीत तपासणी :**

१०० दाण्यांचे ३ संच तयार करा.

५ ते ७ मिनिटे पाण्यात ठेवा.

टरफल सुरकुतलेले/फुगलेले दाणे वगळा.

फुगलेले दाणे - खराब. टरफल शाबूत व सुरकुत्या नसलेले दाणे - चांगले.

७० टक्के किंवा अधिक दाणे चांगले असल्यास बियाणे वापरण्यास योग्य.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २१ मे २०२५

शहर/ग्रामिण

# अंजनगावात अनधिकृत कपाशी बियाण्याचा साठा जप्त

## शेतकऱ्याच्या वेशात कृषी अधिकाऱ्यांची सिनेस्टाईल कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यात अवैध कापूस बियाणे दाखल होताच त्यासंबंधी कृषी विभागाने कारवाईसत्र सुरू केले आहे. अज़नगाव सुर्जी येथे केलेल्या कारवाईत विक्रीची परवानगी नसलेले एचटीबीटी कापूस बियाण्याचे १७४ पॅकेट जप्त करण्यात आलेले आहे. त्याची किंमत २ लक्ष ४४ हजार ३८७ रुपये आकारण्यात आली. तालुक्यातील ही पहिलीच कारवाई आहे. बनावट एचटीबीटी कापूस बियाणे जप्त करून गुन्हा दाखल झाल्याने तालुक्यात बोगस बियाणे विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.देवनाथनगर, सूर्जी अंजनगावयेथे सापळा रचून राहत्या घरातून प्रतिबंधीत एचटीबीटी बियाण्याचा साठा पकडण्यात आला. विनोद वा. सरोदे (वय ५४) हा अनेक दिवसांपासून एचटीबीटी बियाण्याचा अवैध व्यवसाय करतो. या गुप्त माहीतीवरुन त्याला पकडण्यासाठी पंचायत समितीचे कृषी अधिकारी अश्विन राठोड यांनी शेतकऱ्याचे वेषांतर करून त्याला बियाण्याची मागणी केली. त्याने बियाणे विकत देण्याचे मान्य केल्यानंतर पथकातील प्रफुल्ल सातव उपविभागीय कृषी अधिकारी अचलपूर, विराग देशमुख जिल्हागुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अमरावती, भारती जाधव तालुका कृषी अधिकारी, नरेंद्र वसुकर कृषी अधिकारी, अश्विन राठोड कृषी अधिकारी पंचायत समिती ता. कृषी अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी पोलीसांच्या सहकार्यान विनोद सरोदे याच्या राहत्या घरी धाड टाकून घराची तपासणी केली. घरात अनधिकृत बियाण्यांचा साठा आढळून आला. त्यामध्ये एचटीबीटी बियाण्याचे १७४ पॅकेट आढळले. त्याची एकूण किंमत २,४४,३८७ रुपये आहे. जप्त पाकिटांमध्ये अजीत १५५-४जी, आरआर ६५९, गोल्ड ५-जी, एसएटी महाशक्ती ५-जी, सुमो गोल्ड ५-जि, साकेत गोल्ड, ग्लायकोगार्ड एच१०१ या बियाण्यांच्या पाकीटांचा समावेश आहे. ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते व कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विनोद सरोदे यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. २०२३ अंतर्गत ३१८(४) ३३६ (४) ३४०(२), बियाणे नियम, १९६८ (७) (८) नियंत्रण आदेश, १९८३ (३) (९) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१५), अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (३) (७) (९) या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून अटक केली. ही कारवाही पहाटे तीन वाजेपर्यंत चालली. विनोद सरोदे याला न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपास ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक सागर भाष्कर, हवालदार प्रमोद चव्हाण करीत आहेत.

### अनधिकृत बियाण्यांची खरेदी करू नये

अशा प्रकारे अनधिकृत बियाण्याची विक्री होत असेल तर त्याची सूचना नागरिकांनी भरारी पथकाला द्यावी. शे-तकऱ्यांनी अनधिकृत बियाण्यांची खरेदी करू नये तसेच अधिकृत कृषी सेवा केंद्र दुकानातूनच पक्के बिल घेऊन बियाणे खरेदी करावे, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आलेले आहे.


# पोलीस वाहनाची दोन वाहनांना धडक, दोन जण जखमी

## अर्जुन नगर परिसरात पोलीस आणि नागरिकांत तू तू मै मै

### घटनास्थळी पोलिसांविरोधात प्रचंड असंतोष

घटनास्थळी दाखल झाला. तेव्हा नागरिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-**



अमरावती वरून रहाटगाव कडे जाणाऱ्या एका पोलीस वाहनाने अर्जुन नगर बस स्टॉपजवळ भरदिवसा अपघाताची मालिका घडवून आणल्याने परिसरात खळबळ उडाली. आधी एका चारचाकी वाहनाला धडक दिल्यानंतर, तेच पोलीस वाहन रिव्हर्स घेत असताना मागून येणाऱ्या टेम्पोला जबर धडक दिली. या धडकेत टेम्पोतील दोन जण गंभीर जखमी झाले.अपघातानंतर स्थानिक नागरिक आणि दोन्ही वाहनांचे मालक संतप्त झाले. त्यांनी पोलिसांच्या बेफिकीर आणि बेजबाबदार वागणुकीचा समाचार घेत पोलिसांना नूकसानभरपाईची मागणी केली. यावेळी अर्जुन नगर परिसरात पोलीस आणि नागरिकांमध्ये तू तू मै झाली तर घटनास्थळी दाखल झालेल्या गाडगेनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांनी नागरिकांना दमदाटी करून त्यांना मारहाण केल्याचेही समजते. घटनेची सविस्तर हकीकत अशी की,अमरावती वरून रहाटगाव कडे जाणाऱ्या पोलीस वाहन क्र.एम.एच.२७,डी.एल.६२५९ ने अर्जुन नगर बस स्टॉप वरून वळण घेणाऱ्या एम एच ४६,एक्स ०३२७ क्रमांकाच्या वाहनाला जबर धडक दिली. त्यांनतर लगेच पोलिसांच्या वाहनाने रिवर्स घेतला त्यात मागून येणाऱ्या एम एच २७ बी एक्स ००५० क्रमांकाच्या बोलेरो पीक अप वाहनाला सुद्धा धडक दिली यामध्ये दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले तर बोलेरो पीक अप वाहनामधील दोन जण जखमी सुद्धा झाले. घटनेनंतर वाहन मालक आणि स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या या बेजबाबदार वागणुकीचा चांगलाच समाचार घेतला. यावेळी वाहनांचे नुकसान झाल्यामुळे दोन्ही वाहन मालकांनी नुकसान भरपाई देण्याची मागणी केली तर पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना दमदाटी करत मुजोरपणाची भूमिका वठविली. त्यांनतर लगेच गाडगेनगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार ब्रम्हगिरी तसेच इतर पोलीस कर्मचार्यांचा ताफा आणि वाहन मालकांची बाजू समजून न घेता तुम्हाला आत टाकेल असे म्हणत काही नागरिकांना मारहाण केली तर बोलेरो पीक वाहन आणि त्यातील दोन जखमींना बळजबरीने पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले मात्र तेथे त्यांची तक्रार न घेता त्यांना हुसकून लावण्यात आले. घटनेतील दुसरे अपघातग्रस्त वाहनाचे चालक सुधीर पेठे यांनी तक्रार दाखल केली मात्र त्यांच्या तक्रारीला सुद्धा बेदखल करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकारामुळे पोलीस दलाच्या दबंग आणि गैरजबाबदार वागणुकीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. नागरिकांनी निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.यासंदर्भात पोलीस आयुक्त, गृहमंत्री यांना सुद्धा तक्रार पाठविण्यात आली असल्याचे समजते.

# अरविंद चावरिया शहर पोलीस आयुक्त पदी रुजू

## कायदा, सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास देणार प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



शहराचे नवीन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी मंगळवारी (ता. २०) सायंकाळी शहर पोलीस आयुक्त पदाचा पदभार सांभाळला. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनीअमरावती शहराचे नवीन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया मंगळवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास शहरात दाखल झाले. वसंत हॉल येथे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील,आणि कल्पना बारवकर यांनी नवीन पोलीस आयुक्तांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालयात त्यांना सलामी देण्यात आली. त्यानंतर त्यांनी पोलीस आयुक्त पदाचा पदभार सांभाळला. पोलीस आयुक्तपदाची सुत्रे हाती घेताच त्यांनी सर्व ठाणेदारांची भेट घेतली तसेच शहराचा आढावा घेतला.कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास आपले प्राधान्य राहणार आहे, त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे अमरावतीचे नवनियुक्त पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी सांगितले.

# मनपा उपायुक्तांनी केली नालेसफाईच्या कामाची पाहणी

## शहरातील विविध नाल्यांची सुरू आहे साफसफाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**





दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचे कामे मार्च महिन्यापासून जेसीबी, पोकलेन मशीनद्वारे सुरु करण्यात आले आहे.

शहरातील मुख्य मोठे नाले १८ व लहान नाले २२ आहेत. २० मे रोजी काँग्रेसनगर, ऑक्सिजन पार्क, कमल प्लाझा, दस्तूरनगर, श्री अंबादेवी परिसर नाला, एच.व्ही.पी.एम. व बडनेरा येथील तिलकनगर, मातापैल्ल परिसर येथील नाले सफाईचे कामे सुरू असून या कामाची पाहणी करण्याकरिता महानगरपालिका उपायुक्त (प्रशा.) डॉ. मेघना वासनकर, नियंत्रण अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे, कनिष्ठ लिपिक शुभम पांडे यांनी भेट देऊन पाहणी केली.पावसाळापूर्वी शहरातील सर्व नाले साफ झाले पाहिजे. नाल्यातला गाळ त्वरित उचलून घ्यावा. तसेच सर्व लहान मोठ्या नाल्यांची रोजची साफ सफाईची माहिती देण्यात यावी. वेळ पडल्यास पोकलँड व जेसीपी वाढविण्याबाबत सक्त निर्देश उपायुक्त मेघना वासनकर यांनी दिले. सर्व प्रभागातील स्वास्थ निरीक्षकांकडुन व कंत्राटदाराकडुन सर्व नाल्यांची यादी तयार करुन त्या नाल्याची साफ सफाई करण्याबाबत निर्देश दिले. उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी यावेळी व्यापारी वर्ग व नागरिकांना आवाहन केले की, त्यांनी नाल्यात कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये. नाल्यात कचरा टाकल्यामुळे पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होवून पुर परिस्थिती निर्माण होवू शकते. नागरिकांनी नाल्यात कचरा स्वतःहा टाकू नये व इतरही कोणाला टाकू देवू नये.

# खासदार पोहचले शेती बांधावर...

## तातडीने सर्वेक्षण करून नुकसान भरपाई ची केली मागणी

### नुकसानग्रस्त शेतीची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अचलपूर**

अमरावती जिल्ह्यात मान्सूनपूर्व व अवकाळी पावसाने पूर्णपणे धुमाकूळ घातला आहे.. त्यामुळे आज अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील निजामपूर भागातील केळीच्या बागेत जाऊन नुकसानीची पाहणी केली, यावेळी शेती बांधावर खासदार बळवंत वानखडे यांनी जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला व शेतकऱ्याकडून नुकसानीची माहिती घेतली,तातडीने सरकारने व प्रशासनाने दखल घेऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून सर्वेक्षण करावे व शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली, अमरावती जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने तब्बल १४ हजार हेक्टर पेक्षा



जास्त नुकसान झाले आहे.. यामध्ये केळी, कांदा, संत्रा, तीळ यास अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, लवकरच खरीप हंगाम चालू होणार आहे त्यापूर्वी सरकारने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा व आर्थिक मदत करावी अशी मागणी खासदार वानखडे यांनी केली.

# दुचाकीच्या धडकेत ऑटोचालकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१अमरावती-** रस्त्याच्या बाजूला ऑटोरिक्षा उभी करून रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीची धडक लागल्यामुळे ऑटोचालकाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास नवसारी चौकातील आप्पाच्या हॉटेलसमोर घडली. शेख शहबाज शेख हारूण (३०, रा. बिस्मिल्ला नगर,) असे मृताचे नाव आहे.शेख शहबाज हे ऑटोरिक्षा घेऊन नवसारीकडे जात होते. दरम्यान आप्पाच्या हॉटेलसमोर त्यांनी रस्त्याच्या बाजूला ऑटोरिक्षा उभी केली आणि आप्पाच्या हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात होते. त्याचवेळी समोरून येणाऱ्या भरधाव दुचाकीची त्याला जबर धडक बसली. ऑटोरिक्षा चालक शेख शहबाज शेख हारूण गंभीर जखमी झाले. चौकात ड्युटीवर तैनात दोन वाहतूक पोलिसांनी शेख शहबाजला बेस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासणीदरम्यान त्यांना मृत्य घोषित केले. या घटनाची माहिती शहबाजच्या नातेवाईकांना मिळताच, नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली. तसेच नागपुरीगेट पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि घटना स्थळाचा पंचनामा करून दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला.

# निरज मल्टीपर्पज बँकेचे अध्यक्ष व संचालकांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल

## बँकेचे एजंट व गुंतवणूकदारांची १ कोटी ४ लाख रूपयांची फसवणुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर रेल्वे -**

दीड वर्षांपूर्वी चांदूर रेल्वे शहरात मोठ्या थाटामाटात सुरू झालेल्या निरज मल्टीपर्पज निधी लि. या बँकेतील एजंट व गुंतवणूकदारांची तब्बल १ कोटी ४ लाख रूपयांची फसवणुक झाल्याची धक्कादायक घटना ११ सप्टेंबर २०२३ ते २० मे २०२५ च्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी ब्रांच मॅनेजर यांच्या तक्रारीवरून बँकेचे अध्यक्ष व संचालकांवर फसवणुकीचे गुन्हे २० मे रोजी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आले आहे. फिर्यादी ब्रांच मॅनेजर सुधा श्रीकृष्ण हिवराळे यांच्या तक्रारीनुसार नीरज मल्टीपर्पज निधी लि. शाखा चांदूर रेल्वे ही शाखा ११ सप्टेंबर २०२३ रोजी चांदूर रेल्वे येथील गाडगेबाबा मार्केट परिसरात सुरु झाली होती. निरज बँकेचे संस्थापक अध्यक्ष युवराज गिऱ्हे हे असुन त्यांनी संचालकांसह निरज मल्टीपर्पज निधी लि. अमरावती या कंपनीची स्थापना केली. युवराज गिऱ्हे हेच बँकेचे सर्व कारभार पाहत होते. ते ब्रांचमध्ये येत होते तेव्हा त्यांचेसोबत आकाश बोबडे रा. अमरावती हा व्यक्ती नेहमी सोबत असायचा. त्यानुसार चांदूर रेल्वेच्या शाखेचे एकुण ९ एजंट डेली कलेक्शन करीत होते. व बँकेत जमा झालेले पैसे वेळोवेळी संचालक मंडळ येऊन घेऊन जात होते. सदर बँकेत फिर्यादी ब्रांच मॅनेजर यांनी स्वतःचे नावे व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे सुध्दा १३ लाख ९१ हजार २३४ रूपयांची एफडी व सेवींग




अकाऊंट मध्ये ४८ हजार ९६५ रूपये तसेच त्यांचे पती श्रीकृष्ण हिवराळे यांचे सेवींग खात्यामध्ये ३ लाख १९ हजार ८८ रूपये, त्यांचा मुलगा प्रणय हिवराळे याचे सेवींग अकाऊंट मध्ये २० हजार ६०० रूपये अशी गुंतवणुक केलेली आहे. याशिवाय आज अखेर आरडी, एफडी, डेली कलेक्शन मिळुन एकुण १५०० ते १८०० खाती असुन त्यामध्ये एकुण १ कोटी ४ लाख १० हजार ९५२ रूपये गुंतवणुक झालेली आहे. फेब्रुवारी २०२५ पासुन फिर्यादी यांना परतावा द्यायला अडचण येण्यास सुरुवात झाली. तेव्हा बँकेचे मुख्य कार्यालयातील अधिकारी व अध्यक्ष युवराज गिंहे यांना लेखी व तोंडी पैशाची मागणी केली, परंतु त्यांनी टाळाटाळ केली. एजंट व गुंतवणुकदार यांना उत्तरे देणे अशक्य झाल्याने फिर्यादी यांनी १५ एप्रिल पासून शाखा बंद ठेवली असुन, पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथे रितसर अर्ज दिला होता. अशा तक्रारीवरून पोलीसांनी आरोपी नीरज मल्टीपर्पज निधी लि. आणि निरज अर्बन को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.चे अध्यक्ष युवराज भगवान गिऱ्हे (रा. देवी पॅलेस अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३०४ रेवसा रोड अमरावती), उपाध्यक्ष आकाश प्रमोदराव बोबडे (रा. अमरावती), सदस्य निकीता युवराज गिऱ्हे (रा. अमरावती), आकाश राऊत (रा. परतवाडा, तत्कालीन रिजनल मॅनेजर), प्रीतम पडोळे (रा. नेर पिंगळाई, जि. अमरावती), तानाजी ठोंबरे (रा. बीड), दीपक इंगोले (रा. बडनेरा) व त्यांचे इतर साथीदार यांच्याविरूध्द सुमारे १ कोटी ४ लाख १० हजार ९५२ रूपयांची फसवणुक करून या गुंतवणुकदाराच्या रक्कमेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर केला म्हणून बीएनएस कलम ३१६ (२), ३१६ (५), ३१८ (४), ३ (५) व महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थांमधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ च्या कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

### एक महिण्याच्यावर प्रकरण चौकशीमध्ये

या बँकेचे मॅनेजर यांनी एप्रिल महिन्यातच फसवणूक झाल्याची तक्रार चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन मध्ये दिली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी आतापर्यंत सदर प्रकरण चौकशीतच ठेवले होते. यानंतर काहींनी वरिष्ठांकडे याप्रकरणी दाद मागितली. यानंतर अखेर २० मे रोजी याप्रकरणी गुन्हे दाखल झाले आहे. यातील मुख्य आरोपी हा सध्या आर्वी पोलिसांच्या ताब्यात असल्याचे समजते. तेथेही अशाच प्रकारचे प्रकरण घडल्याची माहिती मिळाली आहे.

# हातातील मोबाईल हिसकावणारे दोघे जेरबंद

## गुन्हेशाखेच्या युनिट दोनची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–** मोबाईलवर बोलत रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल हिसकावणाऱ्या दोन युवकांना गुन्हेशाखेच्या युनिट दोनच्या पथकाने अटक करून मोबाईल जप्त केले. केशव महेश नारायणी (वय १९ रा. मधूसुदन कॉलनी) आणि संजय श्रावण स्त्रीची (वय २० रा. दसरा मैदान) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत.

शहरात चोरी व लुटमारीच्या घटना सातत्याने होत आहे. तसेच रस्त्याने मोबाईलवर बोलत जाणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल दुचाकीवर आलेल्या दोन युवकांनी हिसकावून पसार झाल्याच्या घटना राजापेठ ठाण्यात दाखल आहेत. ४ मे रोजी मानकलाल सोमाणी सायंकाळी बियाणी कॉलेज समोर वाकींग करीत होते. त्यावेळी त्याच्या हातात त्यांचा मोबाईल होता दरम्यान दुचाकीवर दोन युवक आले आणि मागे बसलेल्या युवकाने सोमाणीयांच्या हातातील मोबाईल हिसकावून पळून गेले. त्यानंतर काही वेळाने एक महिला कवरनगरकडे पावी मोबाईलवर बोलत जात असताना दुचाकीवर दोन युवक आले आणि महिलेच्या हातातील मोबाईल हिसकावून पसार झाले. या दोन्ही घटनेत राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरु केला. तसेच गुन्हेशाखेचे पथक सुध्दा समांतर तपासकरीत होते. दरम्यान गुन्हेशाखेच्या पथकाला दोन्ही लुटारूंची माहिती मिळताच त्यांनी मंगळवारी दुपारी दोघांना अटक केली. तसेच त्यांची कसुन चौकशी केली असता त्यांनीदोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी दोन्ही मोबाईल जप्त करून आरोपींना राजापेठ पोलिसांच्या ताब्यात दिले. या कारवाईत गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्तवात सपोनि महेश इंगोले, सपोनि अनिकेत कासार, पोलीस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार महेंद्र यवतीकर, दिपक सुंदरकर, गजानन ठेवले, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, सागर ठाकरे, योगेश पवार, विशाल वाकपांजर, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दुधे, महिला कर्मचारी सुषमा आठवले यांचा समावेश होता.

# वाळू माफियांनी दुचाकी चिरडली

## महसूलने तलाठ्याला दिले वाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर बाजार–** वाळू तस्करांच्या विरोधात कारवाई करताना एका अवैष टिप्परने थुगाव-पिंपरी येथील तलाठी यांच्या गाडीला धडक देऊन त्यांची दुचाकी चेंदामेंदा केली होती. दरम्यान महसूलच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून त्या तलाठ्याला नवीन वाहन घेऊन दिले. या घटनेमुळे इतर कर्मचाऱ्यांपुढे महसूल विभागाने आदर्श ठेवला आहे.



फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अवैध रेती तस्करांविरोधात कारवाई करताना निंभोरा गावाजवळ वाळूने भरलेल्या एका अवैध मिनी टिप्परने थूगाव पिंपरी येथील ग्राम महसूल अधिकारी विश्वजीत बंगरे यांच्या होंडा शाईन मोटर सायकलला धडक देऊन ती चिरडली होती. त्यामुळे गाडीचे मोठे नुकसान झाले होते. ग्राम महसूल अधिकारी बंगरे हे काही महिन्यापूर्वीच महसूल सेवेत दाखल झाले होते. दरम्यान नोकरीच्या सुरुवातीलाच त्यांना अशा अप्रिय प्रसंगाचा सामना करावा लागल्याने महसूलच्या इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी देणगी गोळा करून त्यांना नवी दुचाकी खरेदी करुन दिली.

उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव व चांदूर बाजारचे तहसीलदार रामदास शेळके यांच्यासह नायब तहसीलदार, मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन ही बाब अंमलात आणली. नुकसान झालेल्या ग्राम महसूल अधिकाऱ्याला नवीन 'शाईन' दुचाकी घेऊन देऊन, त्या दुचाकीची तहसील कार्यालय मध्ये पूजा करून तहसीलदार रामदास शेळके हस्ते त्या ग्राम महसूल अधिकाऱ्यांना चावी देण्यात आली. यावेळी निवासी नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, सुमित सोनोने, गजानन फुके, ग्राम महसूल अधिकारी प्रतीक चव्ह हरीश तडकित, उमेश तागडे, अजय गवई उपस्थित होते.–

# खडीमल गावात भीषण पाणी टंचाई, विहिरी आटल्या, आदिवासींची भटकंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती –** यावर्षी उन्हाचा पारा ४४ अंशाच्या वर गेल्यामुळे नदी, नाले, विहिरींना कोरड लागलेली आहे. त्यामुळे तालुक्यात बहुतांश गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यात खडीमल गावातसुध्दा टंचाईचा सामना करावा लागत असल्याने आदीवासी बांधवांची भटकंती होत आहे. प्रशासनाचे नियोजन कोलमडल्याचे दिसून येत आहे.



तालुक्यात अनेक गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने प्रशासनाकडून टॅन्करने पाणी पुरवठा होत असलातरी अनेक गावात टॅन्कर पोहचत नसल्यामुळे आदीवासी बांधवांची पाण्यासाठी भटकंती होत आहे. तालुक्यातील खडीमल गावात हातपंप नादूरूस्त असून गावाला पाणी पुरवठ्याबाबत कोणतेही नियोजनदिसून येत नाही. गावातील मायमाऊली विहिरीवर गर्दी करताता दिसून येत आहे. तापत्या उन्हामुळे विहिरींनीसुध्दा तळ गाठलेला आहे. अशी गंभीर अवस्था पाहायला मिळत आहे. शासनाने या गावात टॅन्करने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी आदीवासी बांधवांकडून होत आहे.


# श्री नागरिक सेवा सहकारी संस्थेला ६० तर पूजा कंस्ट्रक्शनला ५० हजार दंड

## मनपा आयुक्तांची धडाकेबाज कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती –** महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे व वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव यांनी ताजनगर, अलीमनगर, बुधवारा, भाजीबाजार, माता खिडकी, अंबानाला, – लालखडी रोड, बुरकापूर, – ॲक्डमिक मैदान व हनुमान नगर परिसराची पाहणी करून साफसफाई करून घेण्याबाबत सक्त निर्देश देण्यात आले. यावेळी श्री नागरिक सेवा सहकारी संस्था यांना ६० हजार रुपये दंड व पूजा कंस्ट्रक्शन यांना ५० हजार रूपये दंड ठोठावण्यात आला.

नाल्यांची आणि गटारांची सफाई केल्याने पाण्याचा योग्य निचरा होतो, पूर किंवा पाणी साठण्याची शक्यता कमी होते. कचरा आणि साठलेल्या पाण्यामुळे डास आणि इतर कीटकांची संख्या वाढू शकते, त्यामुळे अनेक रोगराई पसरण्याची शक्यता असते. साफसफाई केल्याने या समस्या कमी होतात. कचरा आणि घाण साफ केल्याने वातावरण स्वच्छ होते. आरोग्य चांगले राहते. नाल्यांमध्ये आणि गटारांमध्ये साठलेला कचरा आणि गाळ काढून स्वच्छ करणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी पडलेला कचरा आणि प्लास्टिक उचलून योग्य ठिकाणी जमा करणे आवश्यक आहे. रस्ते, चौक आणि





सार्वजनिक जागा स्वच्छ करणे आवश्यक आहे. नागरिकांना कचरा टाकू नये, प्लास्टिकचा वापर कमी करावा आणि साफसफाईत सहभागी व्हावे यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. मनपाच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी सदर कामात सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. नागरिकांनीही या कामात सहभागी होऊन आपल्या परिसराची स्वच्छता जपण्यासाठी मदत करावी, असे आवाहन आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे. नागरिक इतरत्र कचरा टाकतांना आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी. सदर परिसरातील नागरिकांकडून कचरा घंटागाडीद्वारे संकलन करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. यावेळी पश्चिम झोन क्र. ५ भाजीबाजार येथील श्री नागरिक सेवा सहकारी संस्था यांना ६० हजार रुपये दंड व पूजा कंस्ट्रक्शन यांना ५०,००० हजार रूपये दंड आकारण्यात आला.या पाहणी दरम्यान ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, बिटप्यून उपस्थित होते.

# वनातील पाणवठे कोरडे; वन्य प्राण्यांनी घेतली वस्तीकडे धाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–** अवकाळी पावसामुळे उन्हाचा पारा कमी सला तरी बाष्पीभवनाचा वेग अधिकच वाढला आहे. साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून जिल्ह्यातील अनेक लघु, मध्यम प्रकल्प कोरडे पडले आहेत. त्यामुळे वन्यप्राणी पाण्यासाठी गावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसत आहे. अमरावती लगत असलेल्या चिरोडी, वडाळी वनक्षेत्र अंतर्गत वनक्षेत्रातील हरीण, नील गाय, रोही, मोर, लांडोर, बिबट, वानर आदी वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्यावर येणाऱ्या या वन्य प्राण्यांना अपघातामुळे आपले प्राणही गमवावे लागते.

तत्पूर्वी सोमवारी अमरावती ते मार्डी रस्त्यावर दिवाणखेड गावालगत असलेल्या मुख्य



रस्त्यावर कोणीतरी अज्ञात वाहनाच्या धडकेत एक रोही (फिमेल) जखमी झाले. ही घटना दुपारी १२ वाजताच्या सुमारात घडली. यावेळी नागरिकांनी या जखमी रोहिला पाणी पाजले. तसेच वन विभागाला माहिती दिली. काही वेळाने वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जखमी रोहिला उपचारासाठी नेण्यात आले.शहरालगत वन विभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत, मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही. महिनाभरापूर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वन विभागाने प वन्य प्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी म सोडणे आवश्यक आहे. वडाळी,चिरोडी शिवारातील पाणवठे बांधण्यात आले.

# परिवहन कार्यालयाचा भोंगळ कारभार वाहनधारक त्रस्त

## मालवाहू वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्रासाठी पावती तयार करण्याची प्रक्रिया बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–** अमरावती परिवहन कार्यालयाच्या तांत्रिक बिघाडामुळे वाहन धारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे अमरावती ऑटो डीलर असोसिएशनने प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांना निवेदन देण्यात आले.



अमरावती परिवहन कार्यालयात गेल्या ३० दिवसांपासून मालवाहू वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्रासाठी पावती तयार करण्याची प्रक्रिया बंद आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तांत्रिक बिघाडामुळे किंवा सिस्टिम अपडेट करण्यात झालेल्या विलंबामुळे ही समस्या उद्भवली आहे. यामुळे, फिटनेस शुल्क भरल्याशिवाय वाहन हस्तांतरित करणे शक्य नसल्याने शेकडो वाहन मालक आणि विक्रेते त्रस्त आहेत. वाहनांच्या खरेदी–विक्रीनंतर, फिटनेस पावतीअभावी, वाहन नवीन ग्राहकाकडे हस्तांतरित करता येत नाही, ज्यामुळे विक्रेता आणि खरेदीदार यांच्यात अनावश्यक वाद आणि मानसिक ताण निर्माण होत आहे. या गंभीर प्रश्नाबाबत अमरावती ऑटो डीलर असोसिएशनच्या वतीने निवेदन देण्यात आले. या वेळी सचिव संदीप संगई, प्रसिद्धिप्रमुख नासिर सोळंकी, बाबा नवाब यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# जीर्ण झालेल्या इमारतीतच चालतोय आरोग्य केंद्राचा कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी**

तालुका आरोग्य विभागाची इमारत ग्रामीण रुग्णालयाच्या परीसरात पूर्णत्वास गेली आहे, तरीही कामकाज मात्र जुन्या, मोडक्या, जिर्णावस्थेत असलेल्या इमारतीमध्येच सुरु आहे. पावसाळ्यात ही जुनी इमारत धोकादायक ठरू शकते. ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाचे कामकाज नवीन इमारतीमध्ये कधी सुरू होणार, त्याला कधी मुहूर्त मिळणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

या इमारतीला जागोजागी मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. जुन्या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात पाणी गळत असल्याने आरोग्य विभागामार्फत इमारतीवर पॉलिथीन टाकून विभागामार्फत दरवर्षी तात्पुर्ती व्यवस्था केली जाते.

विभागात अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्रामीण भागाचा व शहराचा सुद्धा कामकाज चालत असल्याने कार्यालयत दस्ताऐवज, संगणक, इतर सामान असल्याने जीर्ण झालेल्या इमारतीमध्ये पाणी गळती झाल्यास महत्वाचे शासकीय दस्ताऐवज, संगणक व सामग्रीस नुक्सान पोहचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इमारतीमध्ये कधीही मोठी दुर्घटना घटण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तरीसुद्धा नवीन ईमारतीत स्थलांतरीत होण्याचे आदेश विभागाला प्राप्त नसल्याने येथील आरोग्य अधिकारी, कर्मचारी जीर्ण इमारतीमध्ये जीव मुठीत घेवून समस्यांचा सामना करीत कामकाज करीत आहे.

तालुका आरोग्य विभागाचे कार्यालय अनिष्ट घटना घडण्यापुर्वी ग्रामीण रुग्णालय परीसरात उभारण्यात आलेल्या व बांधकाम पूर्णत्वास झालेल्या नवीन इमारतीमध्ये लवकरात लवकर स्थलांतरीत करण्याचे आदेश पावसाळ्यापुर्वी देवून प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या जीविताशी होणारा खेळ थांबवावा, अशी मागणी सर्वसामान्यांकडून करण्यात येत आहे.

# अवकाळीमुळे संत्रा, कांदा पिकाचे नुकसान; शेतकऱ्यांना मदत करा

शिवसेनेची (उबाठा) निवेदनाद्वारे तहसीलदारांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदुर बाजार –** चांदूर बाजार तालुक्यात अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेती पिकांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या संत्रा व कांदा पिकांचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने (उबाठा) तहसीलदार चांदूर बाजार यांना निवेदन देण्यात आले.



मागील आठ दिवसांपासून तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे संत्रा, कांदा यासारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अति पावसामुळे घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान नुकसानग्रस्तांना मदत देण्यात यावी या मुख्य मागणीसह संजय गांधी, श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांना पाच महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्यामुळे त्यांना तत्काळ मदत करावी, अशीही मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. तहसीलदारांना निवेदन देताना युवासेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपुरे, विक्रम फुकट, दादाराव तायडे, शरद राठोड, रोशन राठोड, चेतन जावरकर यांच्यासह अन्य शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# जिल्हा सामान्य रुग्णालयाचे फायर ऑडिटसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आठ दिवसांचा अल्टिमेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



जिल्हा रुग्णालयातील फायर ऑडिट पाच महिन्यांपूर्वीच कालबाह्य झाले आहे मंगळवारी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देत पाहणी केली. यावेळी १४ मे रोजी शॉर्टसर्किटमुळे आग लागलेल्या रुग्णालयातील विद्युत सबस्टेशन पाहणी केली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला आठ दिवसांमध्ये सब स्टेशन तसेच येथील विद्युत उपकरणांचे काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच फायर ऑडिटही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत.

जिल्हाधिकारी पोहोचण्यापूर्वीच अग्निशमन विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारीही रुग्णालयात पोहोचले. तसेच महापालिका आयुक्त सचिन कलंत्रेदेखील रुग्णालयात आले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे तसेच आरएमओ डॉ. नरेंद्र सोळंखे यांच्याकडून रुग्णालयातील समस्यांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना रुग्णालयात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यासंदर्भात जाब विचारत आठ दिवसांमध्ये विद्युत उपकरणे बदलविण्याच्या सूचना केल्या. तसेच रुग्णालयातील फायर ऑडिट तसेच पावसाळा लक्षात घेता ड्रेनेज सिस्टीमचेही काम आठ दिवसांत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

# दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिवसानिमित्त विभागीय आयुक्तालयात शपथ कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती,**

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी २१ मे रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'साजरा केला जातो. यानिमित आज विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी अपर आयुक्त सूरज वाघमारे, उपायुक्त राजीव फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# रिद्धपूर ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार

## ग्रामविकास अधिकारी कुचकामी-सरपंच, सदस्यांनी केली गटविकास अधिकारीकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मोर्शी**

ग्रामपंचायतच्या मासीक मीटिंगमध्ये घेतलेल्या ठरावानुसार काम केले जात नसल्याचा आरोप करून ग्रामपंचायतचे सरपंच व सदस्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या रिद्धपूर ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक एन. एस. पवार हे २०२४ पासून कार्यरत असून मनमानी करीत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

ग्रामसेवक हे ग्रामपंचायतमध्ये मासिक सभेत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करीत नाही. त्याचबरोबर मागील ५ मार्च व २९ मे रोजीच्या मासिक सभेमध्ये विविध योजने अंतर्गत बांधकामाच्या निविदा मंजूर करण्याबाबतचा ठराव घेण्यात आला होता. मात्र ग्रामसेवक यांच्याकडून ठरावानुसार कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असा आरोप सरपंच व काही सदस्यांनी केला आहे. तसेच ग्रामसेवक यांनी बांधकामाच्या निविदा मंजूर झाल्या असून तरीसुद्धा संबंधित ठेकेदाराला कार्यारंभआदेश दिला नाही. मासिक सभा ५ मार्च आणि २४ मार्चला फेरफारबाबत झालेल्या ठरावानुसार फेरफार घेतला नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पुन्हा २८ एप्रिल रोजी झालेल्या मासिक सभेत ठराव क्रमांक ५ ग्रामपंचायत मालकीच्या दुकान गाळे व मोबाईल टॉवर कर वसुलीबाबत ठराव घेण्यात आला. यापूर्वी दुकानदारांना नोटीस सुद्धा देण्यात आले आहे. परंतु त्यावरही ग्रामसेवकाने कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. तसेच सरपंच यांना सोबत घेऊन गेले नाही. त्याच सभेमध्ये ठराव क्रमांक ९ नुसार रिद्धपूर येथील परतवाडा, चांदुर बाजार महामार्गावरील बस स्टॉपवर असलेले रोडवरील डिव्हायडर काढून गतिरोधक बसविण्याचा ठराव सुद्धा घेण्यात आला होता. कारण त्या ठिकाणी रस्ता अरुंद आहे व त्यातच डिव्हायडर बसविले असून चांदूरबाजाराकडून येणारे वाहन त्या डिव्हायडरला धडकून अनेक वेळा छोटे-मोठे अपघात झाले आहेत. त्यामध्ये जीवितहानी झाली नाही. दुर्दैवाने त्या ठिकाणी जर मोठा अपघात झाला, तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. त्या अनुषंगाने हाच ठराव जर सरपंचांना मिळाला असता तर बांधकाम विभागामार्फत सदर डिव्हायडर काढून त्या ठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले असते व होणारे अपघात टाळता आले असते. अशा प्रकारची सरपंच व सदस्यांनी गटविकास अधिकारी मोर्शी यांच्याकडे तक्रार केली असून आतापर्यंत कुठलीही कारवाई झाली नसल्याचे दिसत आहे.

# लालभडक फुलांनी बहरलेला गुलमोहर वेधतोय लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



वसंत ऋतूची चाहूल पानगळतीने होत असली, तरी वैशाख महिन्यातील रणरणत्या उन्हातही झाडांना हिरवीगार पालवी फुटलेली आहे. उन्हाळ्यात सूर्य आग ओकत असताना निसर्गात पालवीचा साज चढविलेल्या वृक्षवेली व रखरखत्या उन्हातही लालभडक फुलांनी बहरलेला गुलमोहर प्रत्येकाच्या मनाला भुरळ घालत असून, नैसर्गिक सौंदर्य सुखाचा आनंद देत आहे.धारणी तालुक्यातील हरीसाल शिवारात अनेक गुलमोहराची झाडे गर्द केशरी रंगाच्या फुलांनी गच्च भरली असून, लाल रंगाचा देखणा साज चढविलेला गुलमोहर वृक्ष भर उन्हातही मनाला शीतल गारवा देत आहे. एकीकडे उन्हाच्या झळा सहन करत सळसळणारी पालवी मोठ्या दिमाखात तकाकी लेऊन जणू काही जगण्याचा नवा आविष्कारच घडविताना दिसत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात वाऱ्याच्या मंद झुळकेवर डोलणारी गुलमोहराची फुले अधिकच आकर्षक दिसत आहेत. परिवर्तन हा निसर्गनिर्मित नियम आहे. मराठी वैशाख महिन्यातील नैसर्गिक वातावरणाचा परिणाम वनराई व शेतशिवारातील वनस्पतींमध्येही दिसून येत आहे.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाद्वारा ICETSF-2025 आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



तंत्रज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातील नवकल्पनांना चालना देत आणि टिकाऊ भविष्याच्या दृष्टीने संशोधन व विकासाला दिशा देणारी 'प्रथम आंतरराष्ट्रीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान परिषद - ICETSF-2025' (International Conference on Engineering and Technology for a Sustainable Future) हायब्रीड पद्धतीने यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेचे आयोजन पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती व एम. जी. एरिसेंट एज्युकेशनल फाउंडेशन, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. याला युनिव्हर्सिटी ऑफ माल्टा, माल्टा यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.या दोन दिवसीय परिषदेला उद्घाटन प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये डॉ. सुनीता डोल (सहाय्यक प्राध्यापक, वालचंद इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर), श्री. प्रमोद खंडारे (बार्कलेज टेक्नॉलॉजी, पुणे), डॉ. प्रदीप एम. जावंधिया (प्राचार्य, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय), डॉ. मोहम्मद झुहैर (उपप्राचार्य पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय), डॉ. विवेक कुटे (संच संशोधन व विकास), डॉ. मंगेश घोंगे (संस्थापक व संचालक, एम. जी. एरिसेंट फाउंडेशन, यवतमाळ आणि पोस्टडॉक्टोरल फेलो, अमिटी युनिव्हर्सिटी, दुबई) आणि श्रीमती स्नेहा डाखोरे घोंगे (संचालक, एम. जी. एरिसेंट फाउंडेशन, यवतमाळ) यांचा समावेश होता.या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय कीनोट वक्त्यांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉ. हायपेंग लियू (कोव्हेंट्री युनिव्हर्सिटी, युनायटेड किंगडम), डॉ. ललित गर्ग (युनिव्हर्सिटी ऑफ माल्टा), डॉ. दीपिका कौंडल (युनिव्हर्सिटी ऑफ ईस्टर्न फिनलँड), व डॉ. नेझहा मेज्जाद (सीएनएइ एसटीइएन, मोरोक्को) यांचा समावेश होता.

ICETSF-2025 परिषदेतील एकूण ५५५ शोधनिबंध सादर झाले. त्यापैकी ७५ उत्कृष्ट शोधनिबंधांची निवड Scopus- सूचीबद्ध EDP Sciences प्रकाशनासाठी करण्यात आली असून, २१ शोधनिबंध एम. जी. एरिसेंट फाउंडेशनतर्फे प्रकाशित होणार आहेत. भारतासह अमेरिका, इजिप्त, मोरोक्को, बांगलादेश, इंडोनेशिया, तैवान, चीन आणि मलेशिया येथून संशोधन लेख प्राप्त झाले होते. सुमारे १७% स्वीकार प्रमाण हे या परिषदेच्या गुणवत्तेचे द्योतक आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालया अमरावतीचे शैक्षणिक क्षेत्रात जागतिक स्तरावर महत्त्व अधोरेखित झाले आहे ही परिषद केवळ एक शैक्षणिक उपक्रम नसून, संशोधन, विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समाजाभिमुख नवकल्पनांसाठी एक सशक्त व्यासपीठ ठरली आहे. अमरावती सारख्या शिक्षणप्रेमी जिल्ह्याला याचे यजमान होण्याचा मान मिळाल्याने, स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक क्षेत्रात एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे.

# दोन व्यापाऱ्यांकडे २ कोटींची उधारी; बाजार समितीमध्ये गरमागरमी

## दीड कोटी रुपये एकट्या मिलिंद काळेंकडून मान्य






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अचलपूर**

स्थानिक बाजारसमितीमध्ये अडत्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी करणाऱ्या २ व्यापाऱ्यांनी २ कोटी रूपयां चा कृषीमाल क्रेडिटवर खरेदी केला. अडत्यांना १२ दिवसात पैसे देण्याचे बंधन असताना सदर दोन्ही व्यापाऱ्यांकडून रक्कम मिळाली नसल्याने सर्व अडत्यांनी बाजार समितीकडे तक्रारी दाखल केल्या. त्या अनुषंगाने बाजार समितीकडून नोटीस मिळताच सदर व्यापाऱ्याचे अनेक दिवसानंतर मुखदर्शन झाले. यावेळी बाजारसमितीमध्ये सदर मुद्दा निकाली काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. दोन्ही व्यापाऱ्यांकडून हमी म्हणून धनादेश घेण्याचे ठरले.

मिलिंद बाबुराव काळे (५५) रा. चिंचोली काळे आणि राजेश नारायणदास अग्रवाल (२५) रा. धामणगाव गढी अशी व्यापाऱ्यांची नावे आहेत. काळे यांनी तनपुरे यांच्याकडून ४६ लक्ष ४३ हजार, मुरतकर याचे ५ लाख, सर्वेश अग्रवाल ८ लाख ५० हजार, मोनेश अग्रवाल ४ लाख २० हजार, जगनलाल अग्रवाल ८ लाख ७४ हजार, शिवा पेढीवाल ४ लाख १७ हजार, पार्टनर ट्रेडर्स १ लाख ४५ हजार, डिके १६ लाख, गावंडे ३ लाख ९१ हजार, राजेंद्र अग्रवाल ३१ लाख प्रसन ट्रेडर्स ६७हजार, कडू, ६१ हजार, अभिषेकसिरोया २ लाख ८५ हजार, प्रवीण गाडगे शिंदी ५७ हजार, दीपाली कॉर्पोरेशन १ लाख ४० हजार, विठू माऊली ४ लाख ६० हजार, राजेश अग्रवाल १३ लाख, सानवी ट्रेडर्स २ लाख २३ हजार, ओम साई ट्रेडर्स १ लाख, भावेश अग्रवाल १२ लाख १५ हजार, म्हाला, मेहरे ३ लाख ७५ हजार, सर्वेश अग्रवाल ६ लाख ५० हजार, सिरोया २ लाख ८५ हजार, आझमभाई १ लाख ५४ हजार, जगनलाल अग्रवाल ३ लाख २५ हजार, गावंडे ४१ हजार, मीना अग्रवाल १ लाख इतकी रक्कम सदर दोन्ही व्यापायांनी मान्य केली आहे. यापैकी दीड कोटी रक्कम एकट्या काळे यांनी मान्य केली आहे. सदर रक्कम लवकरात लवकर देण्याचेही मान्य करण्यात आले.सदर रक्कम मिळावी, यासाठी अडते व्यापारी गत ३ महिन्यांपासून वाट पाहत होतेः मात्र फोन बंद असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकत नव्हता. एवढी मोठी रक्कम अडकून पडल्याची लेखी माहितीबाजारसमितीला देण्यात आली. त्या अनुषंगाने दोन्ही व्यापाऱ्यांना हजर राहून आपले म्हणणे मांडण्याकरिता नोटीस बजावण्यात आल्या. मंगळवारी दुपारी दोन्ही व्यापाऱ्यांनी बाजारसमितीमध्ये हजेरी लावली. दोन्ही व्यापारी येणार म्हणून सर्व अडते आधीच उपस्थित झाले होते. सभापती सौ. प्रतिभाताई प्रशांत ठाकरे, उपसभापती अमोल चिमोटे, सौ. वर्षाताई कैलास आवारे, संचालक भावेश अग्रवाल, अमोल बोरेकर, पोपट घोडेराव यांच्यासह सचिव योगेश चव्हाण, सहसत्चित मंगेश भेटाळू, ठाकरे आदी कर्मचारी उपस्थित होते. पैसे परत मिळेपर्यंत हमी म्हणून दोन्ही व्यापाऱ्यांनी धनादेश देण्याचे मान्य केले.लवकरात लवकर रकमा देण्याचे सांगून यावर तात्पुरता तोडगा काढण्यात आला. दरम्यान यावेळी गरमागरमसुद्धा आल्याने काही वेळ वातावरण तापले होते. मात्र काही उपस्थितांनी मध्यस्थी केल्याने प्रकरण निवळले.


**बारदाणा विक्रेत्यांचे ३ लाख रुपये**

दरम्यान बारदाणा विक्रेत्यांकडून सदर व्यापाऱ्याने ३ लाख रूपये किंमतीचे पोते विकत घेतलेले धान्य भरण्यासाठी उधारीवर घेतले होते. त्यांचेही पैसे अडकून ठेवण्यात आले. याप्रसंगी सर्व बारदाणा विक्रेते जातीने हजर होते.

# पथ्रोटच्या एका बांगलादेशी रोहिंग्यावर अचलपुरात गुन्हा दाखल

## जन्म प्रमाणपत्रसाठी बनावट कागदपत्र केले होते सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पथ्रोट**




माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आजतपूर तालुक्यात अनेक बांगलादेशी रोहिंग्यानी बनावट कागदपत्रे सादर करून जन्म दाखला घेण्यासाठी अर्ज दाखल केल्याचे संशयास्पद प्रकरण बाहेर काढले होते. सदर प्रकरणाने एकच खळबळ उडाल्यानंतर या प्रकरणाची अचलपूर पोलिस ठाण्यात अचलपूर तहसील कार्यालयांतर्गत जगदीश मंडवे यांनीफिर्याद नोंदवली होती. ज्यामध्ये अमरावती, (कांडली) परतवाडा व पथ्रोट येथील तीन व्यक्तीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करणयात आला आहे.सदर प्रकरणांमध्ये संबंधित अर्जदार यांनी बनावट कागदपत्रे दाखल करून प्रशासनाची दिशाभूल केलेली आहे. शेख कलीम शेख उस्मान रा. पोट यांनी या कार्यालयात अर्ज ८ डिसेंबर २०२४ रोजी सादर केला होता. सदरचे प्रकरण या कार्यालयामार्फत प्रकरण क्रमांक जन्म गॉड क्रमांक २००९, एमआरसी ८१ पचोट पक्ड्कि २०२४/२५ पंजीबद्ध करण्यात आले होते. सदर अर्जदार यांना अर्जासोबत जिल्हापरिषद उर्दू पूर्व माध्यमिक केंद्रीय शाळा पक्षोट या शाळेची अनुक्रमांक १६०२/४ ची टीसी सादर केली होती. सादर केलेल्या अर्जासोबतच्या टीसीमध्ये शेख कलीम शेख उस्मान असे नमुद आहे या कार्यालयाकडूनगटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अचलपूर यांना सदर टीसीची पडताळणी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. शिक्षणाधिकारी पंचायत समिती अचलपूर यानी संबंधित शाळेला सदर अहवाल मागितला असता सदर अहवालामध्ये अर्जदार यांचे नाव अब्दुल कलीम शेख उस्मान शेख करीम असे आहे यावरून सदर अर्जदार यानी नावात खोडतोड करून बनावट टीसी सादर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहेत. वरील अर्जदार यांच्याविरुद्ध अचलपूर पोलिसस्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यास विनंती आहे. अशा लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे. सदर प्रकरणात एका व्यक्ती च्या विरुद्ध जरी गुन्हा दाखल झाला असला तरी मात्र अशा प्रकारच्या संशयित बांगलादेशी २७ रोहिंग्यांची नावे एकटचा पथ्रोट मध्ये समोर आल्याने एकच खळबळ उडालेली आहे.

# कुख्यात माओवादी नेता बसवा राजू चकमकीत ठार

## १.५ कोटींचं बक्षीस होतं : गोळीबारात २७ नक्षलवादी ठार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१गडचिरोली**



गडचिरोली सीमेपासून जवळपास २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या छत्तीसगडमधील अबुझमाडच्या जंगलात बुधवारी सकाळी झालेल्या चकमकी नक्षलवादी चळवळीचा देशातील सर्वोच्च नेता नंबाला केशवराव उर्फ बसवराज(७०) याच्यासह जवळपास २७ नक्षलवादी ठार झाले.

नारायणपूर, बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमाभागात ही चकमक झाली. यात एक सुरक्षा जावान शहीद झाला. चकमकस्थळावर शोधमोहीम सुरु असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील दंतेवाडा, नारायणपूर आणि बिजापूर जिल्ह्याच्या सिमेवरील (ट्राय जंक्शन) अबुझमाड व इंद्रावती राष्ट्रीय उद्यान जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आले होते. यात विविध राज्यात पाच कोटीहून अधिक बक्षीस असलेला नक्षलवादी चळवळीचा देशातील सर्वोच्च नेता, सरचिटणीस तथा 'पॉलिट ब्युरो' सदस्य नंबाला केशव राव देखील असल्याची गोपनीय माहिती सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. त्यानंतर या पारिसरात २० मे रोजी रात्रीच्या सुमारास दंतेवावाडा, बीजापूर, नारायणपूर आणि कोंडागांव जिल्ह्यातील पाचशेहून अधिक 'डीआरजी' व इतर सुरक्षा जवानांनी नक्षलविरोधी अभियान राबवले.

# विघ्नहर्त्याच्या मूर्तिकामास कायदेशीर वादामुळे विघ्न, गणेशमूर्तींची कामे अद्याप सुरू नाही

## मूर्तिकार म्हणतात न्यायालयाचा निर्णय मान्य करावा लागणार

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**


केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जलप्रदूषणाच्या कारणावरून प्लास्टर (पीओपी) गणेशमूर्तींवर बंदी घातल्याने हा वाद न्यायालयात पोहोचला आहे. गणेशोत्सव तीन महिन्यांवर आला तरी पीओपीवर बंदीमुळे अमरावती जिल्ह्यात मोठ्या गणेशमूर्तींची कामेच अद्याप सुरू झाली नाहीत. या बंदीमुळे मूर्तिकार, कामगार यांच्या हाताला काम नसल्याने शेकडो कुटुंबे बेरोजगार होण्याची भीती आहे.

पीओपी मूर्तींवर बंदी घालून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा निर्णय शासनाच्या समितीने घेतल्याने हा वाद न्यायालयात पोहोचला आहे.अमरावती जिल्ह्यात सुमारे ५० हजार घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना व सुमारे चारशे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे उंच गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करतात.

दरवर्षी गणेशोत्सव संपल्यानंतर लगेच मूर्तिकामास सुरुवात होते. मात्र, यावर्षी पीओपीवर बंदीचा निर्णय झाला नसल्याने अद्याप मोठ्या मूर्तींची कामे सुरू झालेली नाहीत. आता पुढील महिन्यात दि. ९ जून रोजी याबाबत सुनावणी होणार आहे. जूनमध्ये पावसाळ्यात हा निर्णय झाल्यास दोन महिन्यांत मोठ्या मूर्ती तयार कशा करायच्या हा मूर्तिकारांसमोर प्रश्न आहे.

पीओपीच्या मूर्ती जगभरात जातात. जगात कुठेही पीओपीला बंदी नाही. मग ती महाराष्ट्रातच का? असा मूर्तिकारांचा सवाल आहे. मूर्तीची उंची जास्त नसावी, या सूचनेलाही गणेश मंडळांचा विरोध आहे. मूर्ती किती उंच असावी, याचा निर्णय घेण्याचे अधिकार प्रशासनाला आहेत. राज्यात ९५ टक्के गणेशमूर्ती या पीओपीपासून बनवल्या जातात. पीओपी जर घातक असेल तर ते संपूर्ण का बंद होत नाही? फक्त गणेशमूर्ती, दुर्गा देवींच्या मूर्तीवरच बंद का? कृत्रिम तलावांची व्यवस्था हा उपाय राबवावा, असे शहरातील काही मंडळाचे म्हणणे आहे.

# चालत्या बस चे चाक निघते तेंव्हा !....




परतवाड़ा – अमरावती रस्त्याने चालत असलेल्या बसचे समोरचे चाक अचानक निघून पळाले .. मात्र बस चालक समीर सौदागर यांच्या सावधगिरीने प्रवाशांचे प्राण वाचले..परतवाडा अमरावती मार्गावरीलआष्टी स्टॉप नजीकची हि घटना आहे. चाक निघाल्याने रस्त्यावरून बस खरपडत गेली. बस मध्ये असलेल्या प्रवाशांनी हा बस अपघाताचा थरार अनुभवला..मात्र या घटनेने बसचा प्रवास किती सुरक्षित असा प्रश्न निर्माण..१० दिवसाआधी देखील बसचे चाक निघाल्याचा घडला होता प्रकार.

# अंगणवाड्यांमध्ये रचली जाणार 'आधारशिला'

## यंदापासून नवा अभ्यासक्रम, राज्यभर होणार अंमलबजावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती :**

राज्यातील अंगणवाड्यांमध्ये तीन ते सहा वर्षे वयाच्या बालकांकरिता नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने 'आधारशिला' या नावाने २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात हा अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.आधारशिला अभ्यासक्रमाची रचना केंद्र सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने विकसित केलेला हा अभ्यासक्रम राज्यात अंमलात आणण्यात येणार आहे. 'आधारशिला बालवाटिका–१', 'आधारशिला बालवाटिका–२' आणि 'आधारशिला बालवाटिका–३' या नावाने हा अभ्यासक्रम राबविला जाईल. या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका, प्रशिक्षण साहित्य व अनुषंगिक साहित्य अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका यांना प्रशिक्षणाच्यावेळी उपलब्ध करून देण्यात येईल. बालकांना पहिल्या वर्गाकरिता शैक्षणिकदृष्ट्या तयार करणे या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट राहणार आहे.

या साहित्याच्या आधारे अंगणवाड्यांमध्ये अभ्यासक्रमाची वर्षभर अंमलबजावणी करण्यात येईल. त्यानंतर या साहित्याच्या उपयोगिता व परिणामकारतेचे मूल्यमापन केले जाईल. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांमार्फत हे मूल्यमापन करण्यात येणार आहे.त्यानंतर या उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. याकरिता अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षणही दिले जाणार आहे.महिला व बालविकास विभागाच्यावतीने राज्यात सुमारे १,१०,६३१ अंगणवाडी केंद्रे चालविण्यात येतात. यामध्ये, ३ ते ६ वयोगटातील सुमारे ३० लाख बालकांचा समावेश आहे. एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत अंगणवाडी सेविकांमार्फत पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, पूर्व शालेय शिक्षण, आरोग्य व पोषण शिक्षण, संदर्भ सेवा इत्यादी सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

**नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी अशी**

राज्यात नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. त्यानुसार २०२५–२६ पहिली इयत्ता, २०२६–२७मध्ये २, ३, ४ आणि ६, २०२७–२८मध्ये ५, ७, ९ आणि ११ तर २०२८–२९मध्ये ८, १० आणि १२ या इयत्तांसाठी अंमलबजावणी होईल.

# काँग्रेसच्या ट्रॅक्टर मोर्चाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक; शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची जोरदार मागणी






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**


शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, हमीभाव, वीजबिल माफी आणि पिकविमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज अमरावतीत भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार वीरेंद्र जगताप, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

मोर्चाला दुपारी १२ वाजता नेहरू मैदान येथून सुरुवात झाली. शेकडो ट्रॅक्टरसह कार्यकर्ते आणि शेतकरी हातात मागण्यांचे फलक घेत भाजप सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले. जिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मोर्चादरम्यान मोठा पोलिस बंदोबस्त तैनात होता आणि मोर्चा शांततेत पार पडला.

या मोर्चात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, कपाशी व सोयाबिन पिकाला २००० रुपये प्रती क्विंटल भावफरक, मनरेगाच्या मजुरांना थकीत मजुरी, तसेच दोन वर्षांपासून रखडलेल्या विहिरीच्या अनुदानाची अंमलबजावणी या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

प्रदेशाध्यक्ष आ. हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवून मोर्चाला पाठिंबा दर्शविला. हा मोर्चा देशाच्या जवानांचा सन्मान राखत आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आहे, असे ते म्हणाले.

माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना फसवले. सातबारा कोरे करणे, कर्जमाफी आणि हमीभावाच्या गाजराने फसवी आश्वासने दिली. आता निवडणुकीच्या तोंडावर देशभक्तीचे नवे मुखवटे घातले जात आहेत. त्यांनी यावेळी शेतकरी आणि जवान यांना देशाचे खरे रक्षण करणारे ठरवत, त्यांच्या सन्मानार्थ हे आंदोलन केल्याचेही स्पष्ट केले.सदर मोर्चा मध्ये खासदार बळवंत वानखडे,कॉंग्रेस नेत्या यशोमती ठाकूर,काँग्रेस ग्रामीण अध्यक्ष बबलू देशमुख,शहराध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर विलास इंगोले,प्रदेश उपाध्यक्ष भैय्याजी पवार,प्रदेश सचिव आसिफ तवक्कल,ब्लॉक अध्यक्ष गुड्डू हमीद, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष अब्दुल रफीक पत्रकार मेराज खान पठाण, संजय वाघ,आनंदबाबू भमोरे,राजीव भेले,अनिकेत ढेंगळे,सुरेश रतावा,प्रमोद इंगोले,संजय शिरभाते,राजेंद्र महल्ले,संकेत साहू,पंकज लुंगीकर,प्रदीप हिवसे,अविनाश भडांगे,किरण सौउरकर,गजानन राजगुरे, धीरज हिवसे,सुनील पडोळे, अनिल तायडे,मनीष पावडे (रोटी बँक)साक्षात पावडे, जयश्री वानखडे,शोभा शिंदे, सुनीता भेले, शिल्पा राऊत, शीतल देशमुख,दीपक हुंडीकर,राजेंद्र भन्साली,मुकेश छांगानी,रवींद्र शिंदे,अभिनंदन पेंढारी,गोपाल यादव,राहुल येवले,लालाजी अग्रवाल,हेमंत गोनेकर,सुरेंद्र मेहरे,राधेश्याम यादव,अन्नूभैय्या व्यास,वैभव देशमुख,शुभम बांबल,जुगल खोडे,लक्ष्मी अहिरे,नंदाताई सोनोने,भारती क्षीरसागर,राजेंद्र शेरेकर, विजय अटाळकर, भूषण मामर्डे, प्रकाश पहूरकर, संजय बोबडे, अरुण बनारसे जावेद साबीर, इस्रार आलम, सादिक शाह,आरिफ खान, हुसैन बगदादी,हुसेन खान, कलाम ठेकेदार,अब्दुल नईम,डॉ. आबीद हुसैन,जुबेर खान,डॉ. मतीन अहेमद,अब्दुल अजीम ठेकेदार, बबलु अलीम नगर, मोबिन चाचा,अतिक सर, राजिक सर,अकिल पहलवान यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# नागपूरच्या आकाशात अनोखे दृश्य, भरदुपारी सूर्याभोवती रिंगण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर**

२१ मे, बुधवारची दुपार नागपूरकरांसाठी काही विशेष ठरली. साधारणत: मे महिन्यात सूर्याकडे चुकुनही न पाहणारे नागपूरकरांचे डोळे आकाशाकडे वळले आणि सूर्याला बघू लागले. आकाशातील दृश्यही नयनरम्य आणि आकर्षक होते. शहरात भरदुपारी १२ वाजताच्या सुमारास अचानकपणे सूर्याभोवती इंद्रधनुष्याचे रिंगण आले. नागपूरकर हे दृश्य बघून चकित झाले आणि याची चर्चा शहरभर सुरू झाली. समाजमाध्यमांवर याची छायाचित्रे आणि व्हिडिओ व्हायरल होताच नागपूरकर या मागील कारणे शोधायला लागले. कुणी याला हवामान बदलाचे संकेत तर कुणी याला चमत्कार म्हणत आहे. अनेकांनी यामागील वैज्ञानिक कारण शोधण्यासाठी गुगलचा वापर केला.



मागील अनेक दिवसांपासून शहरात कधी ऊन तर कधी जोरदार गारपीट बघायला मिळत आहे. काही दिवशी नागपूरकरांनी वादळ–वारा देखील अनुभवला आहे. अशा स्थितीत बुधवारी दुपारी सूर्याभोवतीचे वलय नागपूरकरांसाठी चर्चेचे कारण ठरले.